# आपण आपला मार्ग शोधू या



**वृक्षमित्र**

गडचिरोली / चंद्रपूर

# अनुक्रमणिका


| बैठक क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | पुस्तिका कशासाठी ?<br>पुस्तिका कशी वापरावी ?<br>अभ्यास-मंडळ चालकाने चर्चा<br>कशी चालवावी ? ---- ---- | १ |
| २. | आपले अभ्यास-मंडळ ---- ---- ---- | ४ |
| ३. | गाव-संघटन ---- ---- ---- | ८ |
| ४. | जंगल ---- ---- ---- | ९ |
| ५. | पाणी ---- ---- ---- | १३ |
| ६. | बचत गट ---- ---- ---- | १५ |
| ७. | धान्यकोष ---- ---- ---- | १७ |
| ८. | महिलांच्या समस्या ---- ---- ---- | १९ |
| ९. | दारूबंदी ---- ---- ---- | २१ |
| १०. | रोजगार ---- ---- ---- | २२ |

# पुस्तिका कशासाठी ?

ही पुस्तिका म्हणजे शाळेतील पाठ्यपुस्तक नव्हे. आपण आपल्यासाठी आपला अभ्यास करताना मदत व्हावी इतकाच तिचा हेतू आहे.

आपले प्रश्न, अडचणी सोडविण्याकरता आपल्याला एकत्रित मिळून अभ्यासाचे, शिकण्याचे काम सतत करायचे आहे. या पुस्तिकेत बैठकीचे फक्त दहाच विषय व प्रश्न दिलेले आहेत. या दहा अभ्यास-बैठकांमुळे खालील गोष्टी व्हाव्या अशी अपेक्षा आहे -

१) स्त्री-पुरुष सर्व लोकांना आपणही अभ्यास करू शकतो याची जाणीव होऊन त्यांचा स्वत:बद्दलचा विश्वास वाढावा, तसेच स्वत:कडे पाहण्याची त्यांची दृष्टी बदलावी.

२) समूहात सर्व मिळून अभ्यास करण्याचा सराव व्हावा.

३) शिकण्यासाठी प्रश्न तयार करण्याचे व मग त्यांची उत्तरे शोधण्याचे महत्त्व त्यांना कळावे.

४) आपले प्रश्न दुसरा कुणीही सोडवणार नाही, आपणच त्याकरता पुढे येऊन अभ्यास केला तर मार्ग सापडतो, याचा लोकांना अनुभव यावा.

५) अभ्यासामुळे संघटना व संघटनेमुळे अभ्यास मजबूत व्हावा, आणि दोघांमुळे लोकांची ताकद वाढावी.

६) अभ्यासाची आवड असणाऱ्या लोकांना स्वत:ची व एकमेकांची ओळख पटावी व त्यांचे सतत चालणारे अभ्यास-मंडळ बनावे.

७) पुरुषांइतकीच महिलांनाही अभ्यासाची आवड असते व त्याही अभ्यास करू शकतात याची लोकांना ओळख पटावी, व अभ्यासातील महिलांच्या सहभागाचे महत्त्व लक्षात यावे.

८) 'आपण आपला मार्ग शोधू या' या पद्धतीची ओळख व्हावी.

## पुस्तिका कशी वापरावी ?

१) ज्यांना माहिती मिळविण्याची, बोलण्याची, विचार करण्याची आवड आहे, अशा गावातील दहा स्त्री-पुरुषांनी एकत्र येऊन आपले अभ्यास-मंडळ बनवावे.

२) आपल्याला अभ्यासाची पद्धत समजून घेऊन तिचा सराव करायचा आहे. त्यासाठी आपल्या सोयीची वेळ व जागा ठरवून १० बैठकांत चर्चा करून अभ्यासाची सुरुवात करायची आहे.

३) प्रत्येक बैठक साधारणतः दोन तास चालेल. प्रत्येक बैठकीत एका-एका विषयाची, पुस्तिकेत दिलेल्या प्रश्नांच्या मदतीने, सर्वांनी मिळून चर्चा करायची आहे.

४) चर्चेतून समोर आलेले मुद्दे एका वेगळ्या वहीत लिहून ठेवावे.

## अभ्यास-मंडळ चालकाने चर्चा कशी चालवावी ?

१) **बसण्याची पद्धत** : गोल किंवा चौकोन. ही पद्धत चर्चा करण्याला सोयीची आहे.



**चौकोन**



गोल

२) पहिल्या बैठकीच्या सुरुवातीला प्रत्येकाने आपले नाव, गाव व काय काम करतो / करते ते सांगावे.

३) चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी मंडळ-चालकाने विषयाची थोडक्यात ओळख करून द्यावी. मग पुस्तिकेतील एक-एक प्रश्न वाचावा. तो प्रश्न सर्वांना समजला किंवा नाही ते बघावे, व मग त्यावर चर्चा सुरू करावी.

४) प्रत्येकाला बोलण्यास संधी द्यावी. एकाच व्यक्तीला एकसारखे बोलू देऊ नये. कोणी लाजरा-बुजरा असेल तर त्याला उत्तेजन देऊन बोलण्यास लावावे. दोन तासांच्या चर्चेत प्रत्येकजणाने भाग घ्यावा यासाठी प्रयत्न करावा.

५) कुणी विषय सोडून बोलत असेल तर त्याला थांबवावे. वाचलेल्या प्रश्नावरच चर्चा होईल असे बघावे. एका प्रश्नावरील चर्चा संपल्यावरच त्यापुढील प्रश्न चर्चेकरता घ्यावा.

६) आवश्यक तेथे उत्तेजन द्यावे. उदाहरणार्थ - 'छान', 'उत्तम', 'हा चांगला मुद्दा आहे', 'हा नवीन मुद्दा आहे', वगैरे. मात्र कोणासही

नाराज किंवा नाउमेद करू नये. कोणाचाही अपमान करू नये.

७) कोणासही बोलते करताना किंवा प्रश्न विचारताना त्या व्यक्तीचे नाव घेऊन बोलावे.

८) एक-एक मुद्दा संपला की मंडळ-चालकाने झालेल्या चर्चेची थोडक्यात माहिती सांगावी.

९) महत्त्वाच्या मुद्द्यांची नोंद करावी व विषयाच्या अभ्यासाकरता आणखी काय माहिती मिळवायची आहे ते लिहून ठेवावे.

१०) काही वेळा चर्चेत काही विशेष माहिती सांगण्याची गरज असते. उदा. कायद्यातील तरतूद वगैरे. ती त्या वेळी शक्यतो वाचून सांगावी. तिचा अर्थ समजून घेण्याकरता चर्चा करावी.

११) एका प्रश्नावरील चर्चा संपली की दुसरा प्रश्न वाचावा व त्यावर वरीलप्रमाणेच चर्चा करावी. अशा प्रकारे दोन तासांत सर्व प्रश्नांवर किंवा जास्तीत जास्त प्रश्नांवर चर्चा करण्याचा प्रयत्न करावा.

१२) दोन तासांत सर्व प्रश्नांवर चर्चा न झाल्यास बाकी प्रश्नांचा विचार करून त्या प्रश्नांचा अभ्यास केव्हा पूर्ण करणार ते ठरवावे.

१३) बैठकीच्या शेवटी पुढील बैठकीची जागा, दिवस, वेळ यांची आठवण करून द्यावी. जे कुणी आले नसतील त्यांना पुढील वेळी घेऊन येण्याची जबाबदारी, ज्याला शक्य असेल त्याच्यावर सोपवावी.

– २ –

## आपले अभ्यास-मंडळ

**प्रश्न**

*१. आपल्याला काही शिकण्याची गरज आहे काय ?*

*२. कोणत्या गोष्टी शिकण्याची गरज आहे ?*

*३. त्या शिकण्यात कोणत्या अडचणी येतात ?*

*४. आपले अभ्यास-मंडळ म्हणजे काय ?*
*५. त्याचा आपल्याला काय फायदा होईल ?*
*६. हा प्रयोग कशाकरता व कुणातर्फे सुरू आहे ?*

## अभ्यास-मंडळ म्हणजे आपली शाळा

आपले अभ्यास-मंडळ म्हणजे सगळे मिळून विचार करण्याच्या पद्धतीची शाळा. या शाळेला शिक्षक नाही. किंवा सगळेच शिक्षक आणि सगळेच विद्यार्थी असतात. यात शिक्षण घेण्यासाठी लिहिता-वाचता येण्याचीही गरज नाही. आपल्याला लिहिता-वाचता येत नसेल तरी आपण अडाणी नाही. आपल्याला बुद्धी आहे. आपल्याला विचार करता येतो. आपल्याकडे अनुभव आहे. रोजच्या जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच पुस्तकी ज्ञानाची गरज नसते. अनुभवांची देवाणघेवाण केली आणि एकत्र विचार केला तर आपण आपला मार्ग शोधू शकतो.

या शाळेला खर्च नाही. कारण फी द्यावी लागत नाही. वह्या, पुस्तके, पेन्सिल ह्यांची गरज नाही. शाळेसाठी लांब जायची गरज नाही. आपण बसू तिथे आपली शाळा. शाळेसाठी सुट्टी घेण्याची गरज नाही. कारण आपल्या सोयीप्रमाणे फक्त दोन तास आपण वेळ काढायचा.

या शाळेत शिकायचे काय ? आपल्याला पाहिजे तेच आपण शिकायचे. आपण काय काम करतो ? त्यात कोणत्या अडचणी येतात ? आपण राहतो कसे ? आपला विकास कसा होईल ? आपली प्रगती कशी होईल ? हेच आपले प्रश्न आहेत ना ! त्यांचाच विचार करायचा. एकाने विचार केला तर उत्तर सापडत नाही. मात्र दहा स्त्री-पुरुषांनी विचार केला तर मार्ग सापडतो. म्हणून या मंडळात साधारणतः दहा लोकांनी एकावेळी भाग घ्यावा. जास्त संख्या असल्यास १०-१० चे वेगवेगळे अभ्यास-मंडळ बनवावे. चर्चेसाठी १० ही संख्या जास्त योग्य आहे.





या मंडळाकरता आपल्या गावाने एक मंडळ-चालक निवडलेला आहे. तोही आपल्यापैकीच एक आहे. आपल्यासारखाच विद्यार्थी आणि आपल्याइतकाच गुरुजी.

## शिकण्याची पद्धती

या मंडळात शिकायचे कसे ? पद्धती कोणती ? ती पद्धती आहे, स्वयंशिक्षण पद्धती. स्वयंशिक्षण म्हणजे स्वतः शिकणे. शिक्षणाची गरज सर्वांना असते. लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत, स्त्रियांपासून पुरुषांपर्यंत,

गरीबापासून श्रीमंतापर्यंत, सुशिक्षितापासून अशिक्षितापर्यंत. खरे म्हणजे गरीबांना आणि अशिक्षितांनाच शिक्षणाची गरज जास्त असते. कारण त्यांना जास्त अडचणींना तोंड द्यावे लागते. एका माणसाला उपाय शोधून काढणे कठीण असते. पण आठ-दहा लोक एकत्र आले व त्यांनी मिळून विचार केला तर मार्ग शोधून काढता येतो.

## अभ्यास-मंडळाचा परिणाम

म्हणजेच, आपल्या अभ्यास-मंडळामुळे त्यात भाग घेणारे आठ-दहा लोक हे केवळ विद्यार्थी राहत नाहीत. त्यांचा एक गट तयार होतो. तो एकमेकांना मदत करतो. आपले प्रश्न सोडवतो. संघटना निर्माण करतो. त्या चालवतो.

आपल्या अभ्यास-मंडळात यायची कुणावरही जबरदस्ती नाही. आपली परिस्थिती सुधारावी असे ज्यांना वाटते, त्यांनी एकत्र यावे. आपले अभ्यास-मंडळ स्थापन करावे. आठवड्यातून एक किंवा दोन वेळा, असे एकूण दहा वेळा बसावे. म्हणजे एकूण दोन-अडीच महिन्यांचा काळ. जो विषय असेल त्यावर विचार करायचा. एकमेकांचे विचार समजून घ्यायचे. माहिती मिळवायची. अशा दहा बैठकांतून दहा विषयांवर चर्चा होईल, व पुढे आपल्याला महत्त्वाच्या वाटणाऱ्या विषयावर चर्चा सुरू राहील.

काही गावांनी आपले अभ्यास-मंडळ बनविले. स्वतः अभ्यास करून आपल्या अडचणींवर उपाय शोधले. त्यामुळे त्यांना गावाच्या ग्रामसभेत सर्वसहमतीने चांगले निर्णय घेता आले. त्या निर्णयांची चांगली अंमलबजावणी करता आली. काही प्रश्न सुटायला लागले. लोकांची ताकद वाढली. असेच बाकी सर्व गावांतही व्हावे, म्हणून चंद्रपूरच्या 'वृक्षमित्र' संस्थेने हा प्रयोग सुरू केला आहे.

चर्चेसाठी आठ महत्त्वाच्या विषयांवरील काही निवडक प्रश्न पुढे दिले आहेत.

# गाव-संघटन

१) आपल्या गावाचे नाव काय आहे ? ते कसे पडले ?

२) आपल्या गावात कोण-कोण राहतात ? ते कोणता कामधंदा करतात ?

३) आपल्या गावाशी संबंधित निर्णय कोण आणि कुठे घेतात ?

४) गावाचा निर्णय घेणारी सभा कोणत्या ठिकाणी व कोणत्या वेळी घ्यावी ? कोणत्या ठिकाणी व कोणत्या वेळी घेऊ नये ?

५) गावाचा निर्णय घेणाऱ्या सभेत कोण-कोण हजर असणे आवश्यक आहे ?

६) असा निर्णय घेताना गावातील महिलांसह सर्व लोक सहभागी होतात काय ?

७) या सभेत प्रत्येक कुटुंबातील एक स्त्री व एक पुरुष हजर असणे आवश्यक आहे का ?

८) निर्णय कसा घ्यावा - बहुमताने की सर्वसहमतीने ?

९) शंभर गावकऱ्यांत एकावन्न एका बाजूला व एकोणपन्नास दुसऱ्या बाजूला असतील, तर तुम्ही काय निर्णय घ्याल ?

१०) गावातील एखादी महिला किंवा पुरुष विरोधात असेल तर तुम्ही निर्णय घ्याल किंवा नाही ?

११) बहुमताने निर्णय घेतल्याने गाव-संघटनेवर काय परिणाम होईल ? सर्वसहमतीने निर्णय घेतल्याने गाव-संघटनेवर काय परिणाम होईल ? काय फायदा होईल ? काय नुकसान होईल ?

१२) गावासंबंधी निर्णय घेणाऱ्या सभेत गावाबाहेरील लोकांनी हजर रहावे की नाही ? निर्णय घेणाऱ्या सभेत त्यांनी प्रत्यक्ष भाग घ्यावा की घेऊ नये ?

१३) निर्णय घेण्याआधी गावातील लोक त्या विषयाचा अभ्यास करतात काय ? अभ्यास करीत असल्यास तो कुठे आणि कसा करतात ?

१४) गावाची निर्णय घेणारी सभा नियमितपणे किती दिवसांच्या अंतराने घेणे गाव-संघटन मजबूत होण्याकरता फायद्याचे ठरेल ?

१५) अशा नियमित सभेशिवाय खास कारणाकरता एखादी विशेष सभा बोलवायची असल्यास ती कुणी बोलवावी ?

## – ४ –

## जंगल

१) आपल्या गावाला लागून जंगल आहे काय ?

२) या जंगलात कोणकोणत्या प्रकारची झाडे आहेत ?

३) या जंगलात कोणकोणते प्राणी व पक्षी आहेत ?

४) हे जंगल पूर्वी कसे होते व आता कसे आहे ? काय फरक पडला ?

५) या जंगलातून आपण काय-काय आणतो ?

६) या जंगलावर कोणाकोणाचे जगणे अवलंबून आहे ?

७) या जंगलातून औषधी वनस्पती मिळतात काय ? कोणत्या ?

८) जंगलामध्ये पाण्याचे साठे किती आहेत ?

९) त्यांतील पाणी पूर्वीपेक्षा कमी झाले आहे की जास्त ?

१०) जंगल वाढणे किंवा कमी होणे कशावर अवलंबून असते ?

११) जंगल तोडल्यामुळे पावसाचे प्रमाण कमी-जास्त होते काय ?

१२) पूर्वी जंगलात दिसणारे प्राणी, पक्षी, किडे-किटकूर (कीटक) आता कमी होत आहेत काय ?

१३) कोणत्या जाती वाढल्या आहेत व कोणत्या कमी झाल्या आहेत ? याची कारणे काय ?

१४) जंगलाच्या भागांवर माणसाचे किती प्रमाणात अतिक्रमण झाले आहे ?

१५) जंगलतोड किती प्रमाणात झाली आहे ? होत आहे ?

१६) ती नक्की कोणा-कोणामुळे होते ?

१७) जंगलात बेकायदा शिकारी होतात काय ?

१८) त्याचा काय परिणाम होतो ?

१९) जंगलात दर वर्षी आग लागते काय ?

२०) ती कोण आणि कशासाठी लावतात ? त्याला जबाबदार कोण ?

२१) जंगलतोड, आगी (वणवा), अतिक्रमणे इ. माणसामुळे होणाऱ्या त्रासामुळे जंगलाचे जे नुकसान होते ते रोखण्याचा गावातल्या लोकांनी काही प्रयत्न केला आहे काय ? असल्यास कोणता ?

२२) जंगल कमी झाल्यामुळे जंगलातील प्राणी गावात घुसून गावातील पशू व शेतीचे नुकसान करतात काय ?

२३) ते थांबविण्यासाठी आपण काय प्रयत्न केले आहेत ?

२४) या सर्व प्रश्नांवर गावातील सर्वांनी कधी एकत्र बसून विचार केला आहे काय ?

२५) जंगल राखण्याची जबाबदारी कोणाची ?

२६) फक्त गावकरी किंवा वन विभाग एकमेकांच्या सहकार्याशिवाय हे काम करू शकतील काय ?

२७) 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' ह्या शासकीय योजनेची आपणास माहिती आहे काय ? असल्यास ती कोणती ?

२८) या योजनेत आपले गाव सहभागी झाले आहे काय ?

*नसल्यास*

२९) या योजनेत सहभागी होण्यासाठी आपल्याला काय करावे लागेल ?

३०) या योजनेत सहभागी झाल्यास आपल्याला काय फायदा मिळेल ?

३१) या योजनेत सहभागी होण्यासाठी आपल्याला कोणती जबाबदारी घ्यावी लागेल ?

३२) गट ग्राम-पंचायत असल्यास आपल्या एका घटक गावालाही फक्त स्वतःच्या गावात ही योजना राबविता येते काय ?

३३) ग्रामपंचायत असा ठराव देत नसेल तर काय करावे ?

३४) या योजनेत सर्वजण सहभागी झाले नाहीत तरी ही योजना आपल्या गावात राबविता येते काय ?

३५) योजनेत अशी तरतूद असेल तर तसे करावे की सर्वजण सहभागी होईपर्यंत वाट पहावी ?

*असल्यास*

३६) आपल्या गावात ही योजना केव्हापासून राबविण्यात येत आहे ?

३७) या योजनेला आपल्या गावात कशी सुरुवात झाली ? याची माहिती कोणी दिली ?

३८) ही योजना राबविण्यासाठी काही प्रयत्न करावे लागले काय ?

३९) गावाच्या वन-संरक्षण समितीमध्ये सभासद नोंदवताना प्रत्येक घरातील किमान एका स्त्रीला व एका पुरुषाला सभासद केले आहे काय ?

४०) नसल्यास कां नाही केले ?

४१) वन-संरक्षण समितीशी शासनाने समझौता समयालेख (करारनामा) करून त्याची एक प्रत गावाकडे दिली आहे काय ?

४२) नसल्यास कां नाही ?

४३) गावाच्या ताब्यात दिलेल्या वनक्षेत्राची सूक्ष्म कार्य-योजना तयार झाली आहे काय ?

४४) तिला मंजुरी मिळून, मंजूर योजनेची एक प्रत गावाकडे दिली आहे काय ?

४५) ही सूक्ष्म कार्य-योजना कोणी तयार केली ?

४६) गावातील स्त्री-पुरुषांचा त्यात सहभाग होता काय ?

४७) नसल्यास कां नाही ?

४८) या सूक्ष्म कार्य-योजनेत वनक्षेत्रात माती अडविण्याच्या व पाणी जिरविण्याच्या, तसेच वन्यजीवांच्या संरक्षण व वाढीच्या दृष्टीने आवश्यक कामांची तरतूद केली आहे काय ?

४९) नसल्यास कां नाही ?

५०) वनाच्या बाबतीतले महत्त्वपूर्ण निर्णय कोण व कुठे घेतात ?

५१) या योजनेत सहभागी झाल्यामुळे आपल्याला काही फायदा झाला आहे काय ? असल्यास कोणता ?

५२) या योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी कोणत्या ?

५३) त्या कशा दूर करता येतील ? त्यासाठी आपल्याला काय करावे लागेल ?

५४) ज्या गावात ही योजना चांगल्या प्रकारे राबविली जात आहे असे गाव आपणास माहीत आहे काय ? ते कोणते ?

५५) या योजनेच्या शासकीय निर्णयाची (जी.आर.ची) प्रत आपल्याकडे आहे काय ? ती वाचली आहे काय ? शासकीय निर्णयामध्ये (जी.आर.) काही दोष आहेत असे तुमच्या लक्षात आले आहे काय ?

५६) असल्यास ते कोणते ?

५७) त्यांत काय सुधारणा करावी असे आपणास वाटते ?

५८) भारतीय वन अधिनियम १९२७ (कायदा) आपणास माहीत आहे काय ?

५९) असल्यास काय माहिती आहे ? त्यातील 'ग्रामवन' ही तरतूद आपणास माहीत आहे काय ?

६०) 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' हा शासकीय निर्णय (जी.आर.) व भारतीय वन अधिनियम १९२७ मधील ग्रामवन-तरतूद यांपैकी काय जास्त चांगले आहे असे आपल्याला वाटते ?

*सूचना :*

** महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक एस.एल.एफ. - १०९१/प्र.क्र. ११९/फ -११ दि. १६-३-१९९२ - 'ग्रामीणांच्या सहभागातून वनव्यवस्थापन' ची प्रत वन विभागाच्या कार्यालयातून प्राप्त करावी व त्याचे सामूहिक वाचन करून अर्थ समजून घ्यावा.*

** वन विभागातूनच 'भारतीय वन अधिनियम १९२७' मधील कलम २८ - 'ग्रामवन'ची माहिती झेरॉक्स करून घ्यावी. त्याचे सामूहिक वाचन करून 'ग्रामीणांच्या सहभागातून वन-व्यवस्थापन' व 'ग्रामवन' यांची तुलनात्मक चर्चा करावी.*

** 'वृक्षमित्र' संस्थेने प्रकाशित केलेल्या खालील पुस्तिका मिळवाव्या व सामूहिक चर्चा करावी -*

*१) भारतीय वन नीती १९८८ - माहिती पुस्तिका*

*२) निस्तार हक्क - माहिती पुस्तिका*

– ५ –

## पाणी

१) गावात पिण्याच्या पाण्याची काय सोय आहे ?

२) गावात पिण्याच्या पाण्याचा वर्षभर पुरवठा होतो काय ?

३) उन्हाळ्यातही पिण्याचे पाणी गावामध्येच मिळते काय ?

४) नसल्यास, किती दुरून पाणी आणावे लागते ?

५) हा त्रास कोणत्या दिवसांत जास्त सहन करावा लागतो ?

६) हा त्रास कसा दूर करता येईल ?

७) मे महिन्यामध्ये विहिरीचे पाणी किती खोल जाते ?

८) गावात पाण्याची टाकी आणि नळाची व्यवस्था आहे काय ?

९) असल्यास त्यांतून नियमित पाणी-पुरवठा होतो काय ?

१०) शेतीसाठी पाण्याची काय व्यवस्था आहे ?

११) त्यातून किती जमिनीला ओलिताची (सिंचनाची) सोय होते ?

१२) ही जमीन एकूण शेतजमिनीच्या किती टक्के आहे ?

१३) गावातील सर्व शेतजमिनीला ओलिताची सोय उपलब्ध होऊ शकेल काय ?

१४) जमिनीच्या पोटातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत आहे काय ?

१५) गेल्या १० वर्षांत या पाण्याच्या पातळीत काय फरक पडला आहे ?

१६) जमिनीच्या आतील पाण्याची पातळी कमी होण्याची कारणे काय ?

१७) ही पातळी वर आणण्यासाठी काय उपाय करावेत ?

१८) त्यासाठी आपण काय करू शकतो ? सरकारने काय करावे ?

१९) गावात किंवा गावाला लागून विहिरीशिवाय तलाव, नदी इत्यादी पाण्याची कोणती साधने आहेत ?

२०) त्यांचा वापर कशासाठी व कोणत्या पद्धतीने केला जातो ?

२१) त्यातून बाराही महिने पाणी मिळते काय ?

२२) कमी पाण्यात जास्त पीक घेता येईल काय ?

२३) आहे ते पाणी साठवून, पुरवून कसे वापरता येईल ?

२४) पाण्याची नासधूस कशी टाळता येईल ?

२५) गावात पाण्याच्या साठवणीची काय व्यवस्था आहे ?

२६) गावात पाण्याच्या वाटप व वापराची काय व्यवस्था आहे ?

२७) गावातील पाण्याची मालकी कोणाची ?

२८) ज्याच्याकडे जमीन जास्त, त्याला जास्त पाण्याचा हक्क आहे काय ?

२९) ज्याच्याकडे जमीन नाही त्याचाही पाण्यावर समान हक्क आहे की नाही ?

३०) प्रत्येकाला जमिनीच्या प्रमाणात नव्हे, तर समान पाणी कसे मिळू शकेल ?

३१) त्यासाठी पाण्याचे साठवण व वापर यांची व्यवस्था कशी असावी लागेल ?

३२) विहीर व तलाव ज्यांच्या मालकीचे आहेत, त्यांचीच मालकी त्यातील पाण्यावरही असावी काय ?

३३) माणूस विहीर, तलाव बांधू शकतो. परंतु पाणी तयार करू शकतो काय ?

३४) मग त्यावर त्याची मालकी कशी ?

३५) निसर्गाने किंवा देवाने पाणी फक्त माणसासाठीच निर्माण केले आहे काय ?

३६) पाण्याची गरज आणखी कोणाकोणाला आहे ?

३७) झाडे, पशू, पक्षी, किडे-किटकूर (कीटक) इ.ना जगण्यासाठी आवश्यक तेवढे पाणी मिळाले नाही तर माणूस तरी जगू शकेल काय ?

३८) जीवन सतत चालू रहावे यासाठी पाण्याची व्यवस्था कशी असावी ?

– ६ –

## बचत गट

१) बचत करण्याची आवश्यकता काय ?

२) आपल्या गावात बचत गट आहेत काय ?

३) आपल्या गावात किती बचत गट आहेत ?

४) बचत गट फक्त महिलांसाठीच असतात की पुरुष बचत गटही असतात ?

५) बचत गटात कोण-कोण सामील होऊ शकतात ?

६) एका बचत गटात किती सदस्य असावेत ? आणि कितीपेक्षा जास्त सदस्य नसावेत ?

७) बचत गटातून किती रुपयांपर्यंत कर्ज मिळू शकते ?

८) बचत गटाकडून घेतलेल्या कर्जावर किती व्याज द्यावे लागते ?

९) सावकाराकडून कर्ज घेतल्यास किती व्याज द्यावे लागते ?

१०) बचत गटाने कुणाला कर्ज द्यावे व कुणाला देऊ नये ?

११) बचत गटाचे सर्व निर्णय कोणी व कुठे घ्यावेत ?

१२) बचत करण्यासाठी बँकेत खाते उघडणे आवश्यक आहे काय ?

१३) बँकेत खाते उघडून बचत करण्यात काय फायदा व काय नुकसान होते ?

१४) बँकेत खाते न उघडता बचत केल्यास काय फायदा व काय नुकसान होते ?

१५) गावातील बचत गटांत पूर्ण वसुली होते काय ? होत नसल्यास त्याची कारणे काय ?

१६) संपूर्ण कर्ज-वसुलीसाठी काय उपाय योजावेत ?

१७) कर्जाच्या परतफेडीची मुदत किती असते ?

१८) बचत गटाकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी ?

१९) मुदतीमध्ये कर्जफिड केल्यास काय फायदा होतो ?

२०) मुदतीमध्ये कर्जफिड न केल्यास काय नुकसान होते ?

२१) बचत गटामुळे रोजगार उपलब्ध होईल काय ?

२२) बचत गटातून उद्योगधंदा करता येतो काय ? यातून नफा मिळतो काय ?

२३) बचत गटामुळे गावाचा विकास होईल काय ?

२४) बचत गटामुळे गावाचा कोणकोणत्या प्रकारे विकास करता येईल ?

२५) बचत गटाकडून पिकासाठी कर्ज मिळू शकेल काय ?

२६) बचत गटाकडून कोणकोणत्या व्यवसायांकरता पैसा मिळू शकतो ?

२७) बचत गटांकडे धंद्याचे प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे काय ?

२८) बचत गट गरीबी दूर करण्यात मदत करू शकतील काय ?

२९) बचत गटांमुळे पैशाच्या फायद्याशिवाय आणखी कोणते फायदे होतात ?

३०) बचत गट कसे करावेत ?

३१) बचत गट स्थापन करण्यासाठी कोण योग्य मार्गदर्शन करेल ?

३२) बचत गटाला शासनाकडून कोणते फायदे मिळतात ?

३३) बँकेकडून बचत गटाला केव्हा व किती कर्ज मिळू शकते ? त्याचा व्याजाचा दर काय असतो ?

३४) बचत गटामुळे जमा झालेल्या पैशाचे लोक काय-काय करू शकतात ?

३५) बचत गटात कशामुळे फूट पडू शकते ? ती कशी टाळता येईल ?

३६) बचत गटांची संघटना आवश्यक आहे काय ?

३७) त्या संघटनेचे स्वरूप काय असावे ?

***सूचना :***

*आपल्या बँकेतील अधिकाऱ्यांची भेट घेऊन आपल्या भागात 'नाबार्ड'चे कार्यालय आहे काय याची चौकशी करा. असल्यास त्याचा पत्ता, फोन नंबर, अधिकारी कोण इत्यादी माहिती घेऊन त्यांना भेटा. त्यांचेकडून बचत गट किंवा स्वयंसहायता गटाबद्दल रिझर्व्ह बँकेने दिलेल्या आदेशांची प्रत मिळवा. ती इंग्रजीत असल्यास त्याचे मराठी भाषांतर करून त्याचे सामूहिक वाचन करा.*

— ७ —

# धान्यकोष

# (धान्याचा फंड)

१) आपल्या शेतात पिकविलेले धान्य आपल्याला वर्षभर पुरते काय ?

२) कोणते धान्य आपल्याला विकत घ्यावे लागते ?

३) आपण धान्य विकतो तेव्हा धान्याचा भाव काय असतो ? जेव्हा विकत घेतो तेव्हा काय असतो ?

४) धान्य विकत घ्यायला पैसे नसले तर लोक काय करतात ?

५) सावकाराकडे जाऊन पैसे किंवा धान्य आणल्यावर किती दिवसांत किती परत करावे लागते ?

६) घेतलेल्या धान्य किंवा पैशावर किती व्याज द्यावे लागते ? दर साल दर शेकडा व्याजाचा दर काय पडतो ?

७) या अडचणीतून सुटायचे असल्यास काय करावे ?

८) धान्यकोषाचे नाव आपण ऐकले आहे काय ? आपल्या गावात धान्यकोष आहे काय ?

*असल्यास*

९) आपल्या धान्यकोषात गावातील सर्व लोक सहभागी आहेत काय ?

१०) हा धान्यकोष आपण केव्हा व कसा सुरू केला ?

११) या धान्यकोषामध्ये कोणते धान्य साठविल्या जाते ?

१२) धान्यास कीड, मुंगी, उंदीर लागू नये म्हणून काय विशेष काळजी घेता ?

१३) प्रत्येक घरातून किती धान्य गोळा केल्या जाते ?

१४) धान्य गोळा करणे, टिकविणे, नोंदी करणे, वाटप करणे ही कामे कोण करतात ? हे कोणी व कसे ठरविले ?

१५) धान्यकोषातून धान्यवाटप करण्याचे काय नियम आहेत ? असे नियम कोणी व कसे ठरविले ?

१६) कोणाकडे धान्य नसेल तर धान्याच्या बदली तो काय देऊ शकतो ?

*नसल्यास*

१७) धान्यकोष म्हणजे काय ?

१८) धान्यकोष आपल्या गावात कसा सुरू करता येईल ?

१९) धान्यकोषामध्ये कोणते धान्य साठविल्या जावे ?

२०) धान्यकोषासाठी गावातील सर्व लोकांचा सहभाग आवश्यक आहे काय ?

२१) धान्यास कीड, मुंगी, उंदीर लागू नये म्हणून काही विशेष काळजी घ्यावी लागते काय ?

२२) प्रत्येक घराकडून किती धान्य गोळा करावे ?

२३) धान्य गोळा करणे, टिकविणे, लिहून ठेवणे, वाटप करणे ही कामे कोणी करावीत हे कोण, कसे ठरवेल ?

२४) धान्यकोषातून धान्यवाटपाचे काय नियम असावेत ?

२५) कुणाकडे धान्य नसेल तर तो धान्याच्या बदली काय देऊ शकेल ?

२६) धान्यकोषामुळे गावाला कोणकोणते फायदे होतील ?

– ८ –

## महिलांच्या समस्या

१) आपल्या गावातील पुरुष सकाळपासून रात्रीपर्यंत काय काय कामे करतात ?

२) आपल्या गावातील महिला सकाळपासून रात्रीपर्यंत काय काय कामे करतात ?

३) ह्या दोघांच्या कामामध्ये काय फरक आहे ?

४) घरातील कामांशिवाय बाहेर महिला कोणकोणती कामे करतात ?

५) पुरुष बाहेरील कामांशिवाय घरात काय-काय कामे करतात ?

६) दोघांमध्ये शारीरिक कष्ट जास्त कुणाला होतात ? संसाराची जबाबदारी जास्त कुणावर पडते ?

७) संसाराची जबाबदारी सांभाळताना महिलांना कोणकोणत्या अडचणी येतात ?

८) पाणी भरताना महिलांना कोणकोणता त्रास होतो ?

९) घरचा माणूस दारू पीत असेल तर स्त्रीला काय-काय त्रास होतो ?

१०) बाळंतपणे, घरातील आजारपण ह्यामुळे महिलांना कोणकोणता त्रास होतो ?

११) मजुरीसाठी किंवा इतर रोजगाराच्या कामांसाठी बाहेर पडल्यावर स्त्रीला काही त्रास होतो काय ?

१२) गावातील सर्वच स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळते काय ?

१३) शाळेतील मुलाचे शिक्षण अगोदर बंद करता की मुलीचे ? यामुळे मुलींचे काय नुकसान होते ?

१४) मुलांना व मुलींना वाढविण्यात भेदभाव कां केला जातो ?

१५) हुंडापद्धतीमुळे स्त्रीला सासरी काय-काय त्रास सहन करावा लागतो ?

१६) लहान वयात मुलीचे लग्न केल्यास तिला काय-काय त्रास होतो ?

१७) सासरच्या किंवा माहेरच्या संपत्तीत स्त्रीला समान हिस्सा मिळतो काय ? न मिळाल्यास तिला काय-काय त्रास होऊ शकतो ?

१८) आपल्या गावातील महिलांना आणखी कोणकोणत्या समस्या येतात ?

१९) स्त्रीला होणाऱ्या त्रासाचा तिच्या तब्येतीवर काय परिणाम होतो ?

२०) महिलांच्या आजारपणाकडे पुष्कळदा दुर्लक्ष होते, असे कां ?

२१) बाळंतपणात व इतर आजारपणात स्त्रीला योग्य वेळी उपचार मिळतो काय ? मिळत नसल्यास कां मिळत नाही ?

२२) आपल्या गावातील स्त्रियांना येणाऱ्या अडचणी आपण सोडवू शकतो काय ?

२३) गाव-पातळीवर स्त्रियांच्या वेगवेगळ्या अडचणींवर सर्व एकत्र बसवून उत्तरे शोधता येतील काय ?

२४) कुटुंबामध्ये स्त्रियांना त्रास कमी व्हावा यासाठी काय करता येईल ?

२५) महिलांनी स्वतःच आपल्या समस्या सोडविण्यासाठी काय करावे ?

२६) स्त्रिया आपल्याला होणारे वेगवेगळे त्रास कां सहन करतात ?

२७) स्त्रियांनी आपली खरी जबाबदारी ओळखली आहे काय ? ती कोणती आहे ?

२८) घरातील स्त्री आजारी, दुःखी असली तर त्याचा परिणाम त्या

स्त्रीच्या कुटुंबावर, गावावर व पूर्ण समाजावर होतो काय ?

२९) स्त्रियांची समस्या ही सर्व समाजाची समस्या आहे काय ?

३०) ती सोडविण्यासाठी आपण काय करू शकतो ?

– ९ –

## दारूबंदी

१) आपल्या गावातील लोक दारू पितात की नाही ?

२) दारू पिणारे जास्त आहेत की दारू न पिणारे ?

३) रोज दारू पितात की सणावारी पितात ?

४) दारू गावातच काढली जाते काय ?

५) हा धंदा कोण चालवितात ? स्त्रिया की पुरुष ? गावातील की बाहेरचे ?

६) दारू पिण्याचे पिणाऱ्यावर काही परिणाम होतात काय ? ते कोणते ?

७) दारू पिण्यामुळे पिणाऱ्याच्या कुटुंबावर काय परिणाम होतो ?

८) दारूच्या विक्रीमुळे गावाला काय फायदा होतो ? काय नुकसान होते ?

९) दारूमुळे इतर कोणत्या वाईट संवयी लागू शकतात ?

१०) दारूमुळे मिळणारा पैसा चांगला की वाईट ?

११) सुखी संसाराचा सत्यानाश करून मिळणारा पैसा कोणाला सुखी करू शकतो काय ?

१२) सरकारने दारूबंदी कायदा केला आहे काय ?

१३) आपल्याला आपल्या गावात दारूबंदी कशी करता येईल ?

१४) पुरुषांचा सहभाग नसेल तर फक्त महिलाच गावातील दारू बंद करू शकतील काय ?

१५) गावसभेत हातभट्टीच्या मालकांना बोलवून त्यांच्याशी गावात दारू न काढण्याबद्दल चर्चा करता येईल काय ?

१६) दारूविक्रीऐवजी त्यांना दुसरा पोटापाण्याचा व्यवसाय करता येईल काय ?

१७) हातभट्टी चालविणारी व्यक्ती श्रीमंत व वजनदार असल्यास काय करावे ?

१८) दारूबंदी करण्यासाठी गाव-पातळीवर इतरही काही उपाय करता येतील काय ? ते कोणते ?

१९) अशा प्रकारची दारूबंदी आपल्या आजूबाजूच्या कोणत्या गावात केलेली आहे का ? असल्यास कोणत्या ? त्याबद्दल आपल्याला आणखी काय माहिती आहे ?

२०) या कायद्याची अंमलबजावणी होते काय ? कायदा असूनही बेकायदेशीर दारू सुरू कां राहते ?

२१) दारूबंदी व कायमस्वरूपी गाव-विकास यांचा एकमेकांशी काय संबंध आहे ?

– १० –

## रोजगार

१) वर्षभरात आपण काय काय काम करतो ?

२) किती दिवस आपल्याला काम मिळते आणि किती दिवस आपण रिकामे (बेरोजगार) असतो ?

३) कामाचा मोबदला आपल्याला किती मिळतो ?

४) बेकारीच्या दिवसात आपण काय करतो ?

५) कामाच्या शोधात गाव सोडून आपल्याला बाहेर जावे लागते काय ?

६) बाहेरगावी काम करणे परवडते काय ? बाहेर जास्त मजुरी मिळते काय ?

७) मजुरी जास्त चांगली कुठे मिळते ?

८) असे दरवर्षी बाहेरगावी जात राहिल्यामुळे आपल्या कुटुंबावर आणि गावाच्या व्यवस्थेवर काय परिणाम होतो ?

९) गावातच रिकामे बसून राहिल्यास कुटुंबावर आणि गावावर काय परिणाम होतो ?

१०) आपली बेकारी दूर करण्याकरता आपल्याला काय करता येईल ?

११) आपण राहतो त्या गावातच किंवा गावाच्या जवळ कायम रोजगार मिळू शकेल काय ?

१२) रोजगाराची गावातच कोणकोणती कामे निघू शकतात ?

१३) अशी कामे सर्वांना पुरतील काय ?

१४) सरकार बेकारी दूर करण्याकरता काय प्रयत्न करते ?

१५) रोजगार हमी योजनेचे नाव तुम्ही ऐकले आहे काय ?

१६) अशा रोजगार हमी योजनेत तुम्ही स्वत: काम केले आहे काय ?

१७) या योजनेत रोजगार मिळवायचा असेल तर काय करावे लागेल ?

१८) काम मिळविण्याकरता आपले नाव नोंदविणे आवश्यक आहे काय ? ती नोंदणी कुठे आणि कशी करायची ?

१९) मागितल्यावर किती दिवसांच्या आत काम मिळाले पाहिजे ? तितक्या दिवसांत काम न मिळाल्यास सरकार बेरोजगार भत्ता देण्यास बांधील आहे काय ?

२०) रोजगार हमी योजनेत गावापासून किती अंतरावर काम देण्यास सरकार बांधील आहे ?

२१) रोजगार हमी योजनेअंतर्गत सरकारने काय काम द्यावे हे लोकांना ठरविता येते काय ?

२२) रोजगार हमीमध्ये घेतल्या जाणाऱ्या कामातून मजुरी मिळते, त्याशिवाय त्या कामाचा गावाला काही उपयोग झाला आहे काय ?

२३) फक्त सरकारवर अवलंबून राहून आपल्या बेरोजगारीचा प्रश्न सुटेल काय ?

२४) आपल्या गावातच गावातील सर्वांना वर्षभर काम मिळेल व त्यातून गावाचाही खरा विकास होईल याकरता आपल्याला काय करता येईल ?

२५) गावात केव्हा व कोणती कामे काढावीत हे गाव ठरवेल आणि सरकार त्याकरता पैसा देईल असे होऊ शकेल काय ?

२६) गावातच सर्वांना बाराही महिने काम मिळावे व गावाचा कायमस्वरूपी विकास व्हावा याकरता गाव-परिसरातील पाणी, जमीन, पशू व माणसासह सर्व नैसर्गिक साधनांचे व्यवस्थापन कोणी व कसे करावे ?

***सूचना :-***

*महाराष्ट्र शासनाची सुधारित रोजगार हमी योजना 'श्रमशक्तीद्वारे ग्रामविकास' या कार्यक्रमाची तहसील कार्यालयातून माहिती मिळवावी व तिचा अभ्यास करावा.*

**सर्वसहमतीची ग्रामसभा,**
**तया अभ्यासाची साथ !**
**फाकेल लोकशक्ती-नवप्रभा,**
**करुन अंधःकारावर मात !!**

---

प्रकाशक : मोहन हिराबाई हिरालाल, संयोजक, 'वृक्षमित्र',
चिद्दरवार हॉस्पिटलजवळ, आर.टी.ओ. ऑफिस समोर,
रामनगर, चंद्रपूर - ४४२४०१
फोन : ०७१७२ - ५८१३४

मुद्रक : नीतिन तापस, श्याम ब्रदर्स, गणेशपेठ, नागपूर - १८

जून २००२ : प्रती ३०००